१६ मार्च २००२ ७ रुपये

# साप्ताहिक सकाळ


## 'अमूल'ची यशोगाथा

## जागतिकीकरणाच्या स्पर्धेत भारत जिंकू शकतो !



मंथन / शिल्पा शिवलकर / सुनील वालावलकर





# 'अमूल'ची यशोगाथा

## जागतिकीकरणाच्या स्पर्धेत भारत जिंकू शकतो !

स्थळ - गुजरात कोऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशनची अद्ययावत कॉन्फरन्स रूम.

काळ - आजचा

भोवताली अंधार होतो. व्हिडिओ मशिनचा खटका. समोरच्या मोठ्या पांढऱ्या पडद्यावर साठ वर्षांपूर्वीचा इतिहास उलगडायला लागतो.

गुजरातचा खेडा जिल्हा. दुधा-मधाचा समृद्ध प्रदेश. इतर भारतीय गावांप्रमाणेच इथल्या माणसांचा चरितार्थही मुख्यतः मौसमी शेतीवर अवलंबून आहे. दुधातून मिळणारं उत्पन्न जेमतेमच. हे दूध पोलसन कंपनीसाठी खासगी व्यापारी- कंत्राटदार उचलतात. पेस्तनजी दलाल नावाच्या हुशारी पारशाची ही कंपनी. पोलसनची कॉफी आणि लोणी खूपच प्रसिद्ध असे. मुंबई इलाख्याला दूधपुरवठा करणाऱ्या सरकारी योजनेलाही दूध पुरवायचे कंत्राट पोलसनकडेच. दूध ही नाशवंत वस्तू. याचा फायदा घेऊन पोलसनचे दलाल पाच आण्याच्या भावात एक लिटर दूध मागतात. कष्टाळू शेतकऱ्याला यातलं शोषण दिसतं पण तो हतबल आहे.

ही कोंडी फुटावी कशी? स्थानिक काँग्रेस नेते आणि स्वातंत्र्यसेनानी त्रिभुवनदास पटेल या शेतकऱ्यांचं गाऱ्हाणं वल्लभभाईंकडे नेता. धोरणी वल्लभभाई पटेल मोजकं बोलतात आणि नेमकं बोलतात. ते म्हणतात, 'कोंडी

**भारतातील धवल क्रांतीचे जनक आणि 'अमूल'च्या यशाचे शिल्पकार डॉ. वर्गीस कुरीयन यांना मुंबईमध्ये १२ मार्च रोजी यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही मूल्यसंवर्धन आणि सामाजिक, आर्थिक विकास या क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या नामवंत व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. डॉ. कुरियन म्हणजे व्यवस्थापन क्षेत्रातली जितीजागती दंतकथाच आहे. त्यामुळेच अमूल ही सहकार क्षेत्रामधली संस्था जागतिकीकरणाच्या आव्हानांना आज पुरून उरली. कसं घडलं हे सगळं? आपण यातून कोणता धडा घ्यायला हवा? 'अमूल'ची यशोगाथा डॉ. कुरियन यांच्या मुलाखतीसह...**


फुटेल पण जोखीम उचलायची तयारी हवी.' त्रिभुवनदास निश्चयानं म्हणतात, 'रोज मरण्यापेक्षा जोखीम पत्करणं वाईट नाही.' वल्लभभाई सांगतात, 'मग पोल्सनला दूध विकायचं नाही. शेतकऱ्यांची कोऑपरेटिव्ह काढा. मी थेट नेतृत्व करणार नाही. त्यामुळे इंग्रजांना त्यात राजकारणाचा वास येईल. ते बिथरतील. मी मोरारजीभाईंना पाठवतो. ते म्हणतील तसं करा.'

जानेवारी १९४६. मोरारजी देसाईंची सामरख्यात सभा. सगळे कुतूहलानं ऐकतात. गावच्या लहानग्या पोराच्या तोंडीही एकच घोषणा 'विना सहकार, नाही उद्धार'. कोऑपरेटिव्ह करायच्या हालचाली वेग घेतात. सरकारचा ठाम नकार. तिथून पुढे सुरू होतो एक अभूतपूर्व संघर्ष. मृदू स्वभावाच्या त्रिभुवनदासाच्या नेतृत्वाला वज्राची धार येते. कडकडीत हरताळ. शेतकरी म्हणतात, आमचं दूध शेतात ओतून देऊ पण खासगी व्यापाऱ्यांना थेंबही विकत देणार नाही!

पंधरा दिवसांत मुंबईची काहिली होते. मुंबईचा दुग्ध आयुक्त उन्हातून गाडी काढून आणंदला येतो. शेतकरी गोळा होतात. बघतात. साहेब गाडीतून उतरतो. त्रिभुवनदास पटेलांना म्हणतो, 'हरताळ उठवा, नाही तर सरकार कारवाई करेल.' त्रिभुवनदासांचा सौम्य चेहरा विलक्षण करारी होतो. नजर खंबीर आणि मनात आग पेटते. म्हणतात, 'साहेब, सरकार काय कारवाई करणार, कारवाई आम्हीच करून दाखवतो.' त्यांच्या हातातला काठोकाठ दुधाने भरलेला पितळी घडा ते उपडा धरतात. पांढरंशुभ्र दूध खालच्या बाजूच्या मातीत मिसळून जातं. तेवढाच आवाज. एरवी गोठलेली शांतता.

साहेब मनात समजतो.सरकारला संदेश कळतो. अधिकारी आपसात म्हणतात, 'करूच देत यांना कोऑपरेटिव्ह. हा न्यूझीलंड की डेन्मार्क नाही. या अडाणी शेतकऱ्यांना दोन महिनेसुद्धा कोऑपरेटिव्ह चालवायला जमणार नाही.' ते एकमेकांत हसतात.

इथं पडद्यावरचा काळ बदलतो. 'अमूल- द टेस्ट ऑफ इंडिया' या परिचित घोषवाक्याबरोबरच अभिमानानं लिहिलेली अक्षरं उमटतात. अडाणी शेतकऱ्यांची ही कोऑपरेटिव्ह पंचावन्न वर्षं पूर्ण करून आजही पाय रोवून ताकदीनं उभी आहे. नंतर पडद्यावर आजच्या काळातली अमूल वेगवेगळ्या दृश्यांमधून व्यक्त होत राहते. जागतिकीकरणाच्या उंबरठ्यावर पुन्हा एकदा कसोटीला तोंड द्यायला सज्ज झालेला एक सुदृढ उद्योग.



सायकल,रेल्वेचा खास डबा,उंटाची गाडी आणि होडी अशा सर्व प्रकारच्या वाहनातून दुधाची वाहतूक



बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आव्हानांना पुरून उरलेले 'अमूल'

# अमूलला संपवणं सोपं नाही, कारण...

- डॉ.वर्गीस कुरीयन

**आपण आर्थिक उदारीकरणाचं धोरण स्वीकारलं, त्याला आता दहा वर्षं झाली. या काळातल्या एकूण घडामोडींबद्दल तुमची काय भूमिका आहे?**

आर्थिक उदारीकरण, जागतिकीकरण हे फॅन्सी शब्द आहेत. त्यांचा अर्थ इतकाच होतो, की आपण त्या करारावर सह्या करून भारतीय बाजारपेठ लुटायला परवानगी दिलीय. भारतीय उत्पादकांना वाऱ्यावर सोडून दिलंय. अशा स्पर्धेमध्ये टिकून राहण्याची ताकद भारतीय उत्पादकांमध्ये आहे की नाही, ते मला माहीत नाही. मला माझ्यापुरतं एवढं नक्की माहितीय, की युरोप आणि अमेरिकेतले देश डेअरीची उत्पादनं निर्यात करतात; त्या निर्यातीवर तिकडं ६३ टक्क्यांची सबसिडी आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संदर्भात 'डम्पिंग' नावाची एक संज्ञा वापरली जाते. तिची व्याख्याच अशी आहे, की एखादा देश एखादी वस्तू स्वतःच्या देशात जेवढ्याला विकतो, त्यापेक्षा कमी भावात ती दुसऱ्या देशात विकत असेल, तर हे डम्पिंग आहे. युरोप आणि अमेरिकेच्या निर्यातीवर तिथं इतकी सबसिडी असेल, तर ही उत्पादनं ते जागतिक बाजारपेठेत डम्प करतायत हे उघडच आहे. आपल्या सरकारच्या मंत्र्यांना ही गोष्ट समजायला



''अमूलच्या यशामागे त्याच तोडीचे कष्ट आहेत, पण तेवढंच पुरेसं नाही. आम्ही लोक 'मार्केटिअर्स' आहोत. मराठी माणसांनी लढाया कराव्यात, गुजरात्यांनी पैसा सांभाळावा...''

हवी. अशा देशांवर 'ॲन्टिडम्पिंग ड्युटी' लावायला यांना जमलं पाहिजे.

निर्यातीवरची ही सबसिडी म्हणजे ती खुली स्पर्धा नाही. सबसिडी नसेल, तर मी त्यांच्या स्पर्धेला तोंड द्यायला तयार आहे. भारताचा डेअरी उद्योग त्या दृष्टीनं समर्थ आहे; पण त्यांचं सरकार अनुदान देतंय नि आपलं सरकार गप्प बसलंय म्हटल्यावर ही लढाई विषम होते. हा न्याय नाही. आज यशस्वी असलेला आपला डेअरी उद्योगही अशा लढाईत उद्या भुईसपाट होऊ शकतो. इतर क्षेत्रांमध्ये हे आज घडतंच आहे.

'ब्रिटस्टॉर्म' नावाची आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध अशी टायरची फॅक्टरी आहे. त्यांची एक दिवसाची विक्री ही 'एमआरएफ'च्या वर्षभरातल्या विक्रीएवढी आहे. एमआरएफ चिरडून टाकणं त्यांच्यासाठी खूप सोपं आहे. आज जी काही परदेशी गुंतवणूक होतेय, त्यातील शेतीमध्ये होणारी गुंतवणूक बघताना मला काळजी वाटते. बहुराष्ट्रीय कंपन्या जेव्हा एखाद्या ठिकाणी पैसा घालतात, तेव्हा घातलाय त्यापेक्षा जास्त पैसा दीर्घकाळात तिथून कसा काढून न्यायचा, तो हुकारो त्यांच्याकडं असतेच. आपण सावध राहायला हवं.

**अशा वेळी सरकारकडून काय अपेक्षा**

गुजरात कोऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशनचा ताजा वार्षिक अहवाल ठोस आकडेवारीनिशी हीच गोष्ट सांगतोय.

तेव्हाची बलाढ्य पोल्सन तर काळाच्या ओघात कधीच नामशेष झाली. आजची अमूल बलाढ्य बहुराष्ट्रीय कंपन्यांना तितक्याच जिगरीनं टक्कर देतीय. अमूल आईस्क्रीमनं पदार्पणातच खपाचा विक्रम नोंदला. परदेशी कंपन्यांचं चीज धंदा बाजारात आपूनही अमूलनं चीजचं मार्केट राखलं. नव्हे, वाढवलं! लोकप्रिय अमूल लोणी आणि दूध पावडरीची विक्री आजही तडाखेबंद होतीय. अमूल चॉकलेट आणि न्यूट्रामूल्ससारख्या उत्पादनांचा खप वाढतोय. पनीर, 'मिठाई मेट' आणि 'मस्ती' दह्यासारख्या नव्या उत्पादनांना मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. निर्यातीच्या आघाडीवरच्या खबरी आनंदाच्या आहेत.

सध्याच्या वातावरणात अभिमान वाटावा अशा एका अमूलची ही हकिगत...

## लोहपुरुषाचं स्वप्न

दुधाचा महापूर योजनेच्या काळात ज्या आणंद पॅटर्नचा बोलबाला झाला, ते हे आणंद गाव. यशस्वी सहकाराची गंगोत्री.

या मध्यम आकाराच्या शहर- गावातून कोट्यवधींची उलाढाल होते. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर बडोद्याच्या पुढे थोड्या अंतरावर इथंच अमूल डेअरी आहे. इथून माफक अंतरावर अमूल चॉकलेट आणि पशुखाद्याचे प्रकल्प आहेत. अमूल डेअरीच्या शेजारीच गुजरात कोऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशनची इमारत आहे. पलीकडे नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाचं कॅम्पस. इथूनच दुधाच्या महापुराची योजना कार्यान्वित झाली. त्याच्याच बाजूला आहे

ठेवायला हवी?

सरकारची भूमिका ही संरक्षण करण्याचीच असली पाहिजे. या देशाचे म्हणून जे न्यायोचित् आर्थिक हितसंबंध असतील, त्यांचं रक्षण करा. आता कोणी सीमेवरून आक्रमण करून तुमच्यावर राज्य करायला येणार नाही. इतक्या लाखो-कोटी भारतीयांवर राज्य करणं हे भयंकरच काम आहे. कोणाला त्याची हौस नाही. त्यांना तुमची आर्थिक लूट करायचीय आणि सध्याच्या अशा निर्णायक वेळीही आपल्या कारभारातला भोंगळपणा कमी होत नाही.

वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनच्या अलीकडं झालेल्या वाटाघाटींच्या दरम्यान मी खरोखर अस्वस्थ झालो. इंटरनॅशनल डेअरी फौंडेशनच्या बैठकीला आपल्या संयुक्त सचिवाला पाठवू नका, म्हणून मी सरकारचं मन वळवलं. दुग्धविकासाचे हे संयुक्त सचिव महाशय एक आयएएस अधिकारी. ते काल कामगार विभागाचे संयुक्त सचिव होते. उद्या कुठं उद्योग खात्यात जातील. आज ते योगायोगानं शेती खात्याला लाभलेयत. तर असा माणूस भारताचं प्रतिनिधित्व करणार! तो तिथं जातो आणि करारांवर सह्या करतो. त्याला हा विषय धड माहीत नाही. उलट न्यूझीलंडसारखा देश पाच प्रतिनिधी पाठवतो. त्यातला प्रत्येक जण डेअरीच्या अगदी लहानसहान शाखेतलाही तज्ज्ञ माणूस असतो. आपला आयएएस काय करणार त्यांच्यापुढे? गाढव बनून परत येतो.

आपला शेतीमंत्री कोणी तरी वकील असतो आणि मुळात तो राजकारणी माणूस. सचिव असतो त्यानं तीस वर्षांपूर्वी एक स्पर्धात्मक परीक्षा दिली म्हणून आता तीस वर्षं सीनियर. त्याच्या निवृत्तीला दोन वर्षं उरली, म्हणून त्याला सचिव नेमला. मंत्र्याला काही माहीत नाही. सचिवाला काही माहीत नाही. अशा रीतीनं देश चालवता येतो काय? आपली प्रशासकीय यंत्रणा म्हणजे नुसती बजबजपुरी आहे. या देशातली सगळ्यात ताकदवान कामगार संघटना कुठली असेल, तर ती या आयएएस अधिकाऱ्यांची आहे !

मला सरकारला सांगायला लागलं, की तुम्ही स्वतःचं राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ नेमलंय. ही सरकारी संस्था आहे. तिच्यावर काही तज्ज्ञ मंडळी आहेत. तुम्हीच त्यांची नेमणूक केलीय. त्यांनी आपलं प्रतिनिधित्व करायला का नाही पाठवत? त्यांना पटलं ते. आता अमृता पटेल जाईल. आपले हितसंबंध आता तिच्या हातात सुरक्षित आहेत, असं समजायला हरकत नाही.

**सहकारी चळवळीत अमूलच्या यशाला तोड नाही. उलट महाराष्ट्रात आता सहकारी उद्योगांना सांभाळून घ्यायचं थांबवा, अशी टीका का होते?**

अमूलच्या यशामागे त्याच तोडीचे कष्ट आहेत आणि मुख्य म्हणजे व्यवहाराचे भान आहे. वीस वर्षांपूर्वी भारताचं दूधउत्पादन २० दशलक्ष टनांवर अडकून राहिलेलं होतं. मग दुधाचा महापूर योजना आली. मी तिथं अध्यक्ष होतो. या काळात दुधाचं उत्पादन ८० दशलक्ष टनांपर्यंत वाढलं. एखाद्या शेतकऱ्यानं जास्त बटाटे पिकवले की काय होतं? किमती पडतात आणि पीक काढायला जो खर्च आला तेवढाही वसूल होत नाही. आम्ही हे घडू दिलेलं नाही. कशामुळे, तर चांगल्या पद्धतीनं मार्केटिंग सांभाळून ! अगदी थोड्या लोकांना ही गोष्ट कळू शकते, की उत्पादन वाढवायचं, तर जनावरांची कृत्रिम गर्भधारणा करून भागत नाही, तिथं चांगलं मार्केटिंगकौशल्य लागतं. आम्ही लोक 'मार्केटिअर्स' आहोत.

तुम्ही आत येताना जो माणूस माझ्या केबिनमधून बाहेर पडत होता, तो कोण आहे? त्याचं नाव व्यास. गुजरात को-ऑप. मिल्क मार्केटिंग फेडरेशनचा व्यवस्थापकीय संचालक. त्याचं क्वालिफिकेशन काय आहे? तो मार्केटिंगचा माणूस आहे, तो डेअरीवाला नाही ! तो दोन हजार कोटींची उलाढाल करतोय. आम्ही गुजराती लोक 'बिझिनेस' करतो तो असा ! महाराष्ट्रात तुम्ही कसा बिझनेस करता, मला माहीत नाही. मला एवढंच माहितेय, की आमचे गुजरातीच महाराष्ट्रात जाऊन धंदा करतायत. तुम्ही लढाया करा; पैसा ते सांभाळतायत.

बिझनेस इज बिझनेस. सहकारी उद्योग हा उद्योगासारखाच चालवायचा असतो. संचालक मंडळ अशिक्षित असलं तरी चांगला कार्यक्षम, प्रामाणिक व्यवस्थापक नेमण्याचं शहाणपण त्यांच्याठायी असलं पाहिजे. आज महाराष्ट्रात बहुतेक को-ऑपरेटिव्हजवर आयएएस अधिकारी बसवलेयत. या कसल्या को-ऑपरेटिव्हज? जिथं सहकाराची मूलभूत कल्पनाच नीट राबवत नाहीत, तिथं त्या चालणार कशा? मी अमूलचा पगारी नोकर आहे. मला त्यांनी गुजरात फेडरेशनचा अध्यक्ष म्हणून कशाला

प्रतिष्ठित 'इर्मा' इन्स्टिट्यूट ऑफ रूरल मॅनेजमेंट आणंद. येथे कोऑपरेटिव्हच्या व्यवस्थापकांची नवी पिढी तयार होते. आपापल्या स्वतंत्र परिघात काम करणाऱ्या या संस्थांच्या बांधकामांना एकसारखा चेहरा आहे. प्रत्यक्ष त्यांच्या आशयातही तितकीच एकवाक्यता आहे.

इथून जवळच आहे गुजरातचं शेतकी विद्यापीठ. वल्लभ विद्यानगर आणि पशुवैद्यक महाविद्यालय आणि भोवताली पसरलीत हजारो खेडी! या खेड्यांमधून भल्या पहाटे सभासदांच्या प्राथमिक सहकारी संस्था दूध गोळा करायच्या कामाला लागतात. सुमारे सहा लाख सभासदांच्या हजारभर सोसायट्यांमधून दरदिवशी दशलक्ष लिटरहून जास्त दुधाचा ओघ आणंदच्या डेअरीकडे येतो. या रसरशीत मुळांवरच आणंदच्या सहकार साम्राज्याचा वटवृक्ष भक्कम उभा आहे.

आणंदजवळचं गोपालपुरा गाव. त्रिभुवनदास पटेलांनी ज्या दोन गावांपासून कोऑपरेटिव्हच्या उभारणीला सुरवात केली, त्या आद्य सोसायट्यांपैकी ही एक सोसायटी.

भल्या सकाळी दूध गोळा करणाऱ्या केंद्रासमोरची लहानशी रांग. बाया- माणसं- मुली. त्यांच्या हातात दुधानं भरलेल्या लहान-मोठ्या, स्टील- पितळेच्या घागरी. सोसायटीचे कर्मचारी कामात गढलेले. प्रत्येक सभासदानं आणलेलं दूध मोजून त्यातून नैवेद्याच्या वाटीएवढं छोटं सॅंपल काढतात. दुधातला स्निग्धांश तपासण्यासाठी त्याचं मशिन आहे. आज किती दूध घातलं, किती स्निग्धांश, त्याची सभासदाच्या खात्यात लगोलग नोंद होते. संगणकावरची पावती फाडून सभासदाला दिली जाते. तिथेच दुसऱ्या खिडकीतून सभासदानं काल किती दूध घातलं होतं

नेमलाय? कारण धंदा आणि राजकारण एकमेकांपासून लांब राहावं म्हणून मी तिकडं असणं आवश्यक आहे.

गुजरात्यांना कळलं, की धंदा चालवायला व्यावसायिक श्रेणीचे व्यवस्थापक लागतात. मी इथल्या संचालक मंडळाचा नोकर आहे. त्यांचं समाधान नाही झालं तर ते मला काढून टाकू शकतात. तरीही मी गेली बावीस वर्षं अध्यक्ष आहे. लोकशाहीचा अर्थ असा नाही, की तुम्ही मुख्यमंत्री बदला. त्याचा अर्थ इतकाच घेतला पाहिजे, की तुम्ही त्याला बदलू शकता. इंदिरा गांधींनी आपल्या मर्यादा ओलांडल्या तर तुम्ही त्यांनाही खाली खेचू शकता; पण म्हणजे ऊठसूठ याला काढ, त्याला नेमा असं नाही.

प्रश्न असा आहे, की महाराष्ट्रातल्या राजकारण्यांना माझ्यासारखा एखादा व्यवस्थापक चालणार आहे का? संचालक मंडळाला असा व्यवस्थापक आवडेल, की जो संचालक मंडळाच्या बैठकीत अध्यक्षाला सांगतो, 'सॉरी, मिस्टर चेअरमन, ही गोष्ट होणार नाही. आपल्या सहकारी संस्थेच्या हिताच्यादृष्टीनं ही गोष्ट बरोबर नाही...?'

**...म्हणजे सहकारी मॉडेलचं यश संपूर्णपणे नेतृत्वावर अवलंबून आहे?**

अर्थातच, सहकाराचं यश नेतृत्वाच्या क्षमतेवर अवलंबून आहे, त्याहीपेक्षा ते नेतृत्वाच्या सचोटीवर अवलंबून आहे. सचोटीचा अर्थ मी पैसा चोरत नाही इतकाच नाही. सचोटीचा अर्थ होतो कामाशी शंभर टक्के निष्ठा. इथं गुजरात को-ऑपरेटिव्हमध्ये कोणाच्या नातेवाईकाला नेमायला बंदी आहे. तसं कुठं लिहिलेलं नाही; पण तो अलिखित कायदा आहे. हा आदर्श त्रिभुवनदास पटेल यांनी घालून दिलाय, स्वतःच्या उदाहरणातून.

डेअरीच्या कामात मी बुडालेला होतो, तेव्हा कुटुंबाकडं तसं दुर्लक्षच झालं. माझ्या घरी एक गुजराती बाई राहायची. तिचं नाव मणीबेन वल्लभभाई पटेल. त्या मला एकदा म्हणाल्या, 'कुरीयन, तुला ठाऊकाय की दिल्लीच्या तीन प्रसिद्ध चेटकिणींपैकी एक मी आहे.'

मी म्हटलं, 'काय बोलता मणीबेन...' (आणि मग दुसऱ्या दोघी कोण?)

(त्या दोघी होत्या राजकुमारी अमृत कौर आणि फातिमा जिना.) मणीबेन मला सांगत होत्या, 'माझी आई माझ्या लहानपणीच वारली. वडिलांनी माझ्यावर प्रेम केलं; पण ते देशाला स्वातंत्र्य मिळवून द्यायच्या लढाईत गुंतलेले होते. त्यांना माझ्याकडं लक्ष द्यायला वेळ नव्हता. माझं लग्न लावून द्यायलाही त्यांना वेळ नव्हता. मी मग काय करणार, मी स्वतःचं आयुष्य दुय्यम मानून त्यांची काळजी घ्यायला लागले. मला कधी आयुष्यात प्रेम लाभलं नाही, म्हणून मी चेटकीण झाले. तुझ्या मुलीचं असं होऊन देऊ नकोस कधी. कुटुंबाचा असा त्याग करू नये कोणी. ही चुकीची निवड आहे.'

मणीबेनचे वडील वारले तेव्हा एक बॅग आणि चेकबुक घेऊन त्या नेहरूंकडं गेल्या. म्हणाल्या, ''माझ्या वडिलांनी त्यांच्या पश्चात हे तुमच्या ताब्यात द्यायला सांगितलं होतं. नेहरू म्हणाले, 'धन्यवाद मणीबेन.' त्यात सगळी मिळून पंचवीस लाखांची रक्कम असेल. मणीबेन म्हणाल्या, की मी थोडा वेळ तिकडेच थांबून राहिले. मला वाटलं जवाहरलाल काही तरी म्हणतील. ते काहीच बोलेनात, तेव्हा मी उठून आले.'

'मी विचारलं, 'मणीबेन, नेहरूंनी तुम्हाला काय म्हणायला हवं होतं?'

'मला वाटलं होतं, जवाहरलाल विचारतील की मणीबेन, आता तू कशी जगशील? तुला काही मदत लागली, तर सांग म्हणून !'

आपल्याला माहीत आहे जवाहरलालांची मोतीलाल नेहरूंनी चांगली काळजी घेतली होती. जवाहरलालांनी इंदिरेचीही चांगली काळजी घेतली. इंदिरा गांधींनी राजीव गांधींची घेतली. उलट सरदारांनी काय केलं? प्रचंड तफावत आहे तिथं. आपला मुलगा डाह्याभाई दिल्लीला आला, तर सरदार त्याला आपल्या घरात राहायला द्यायचे नाहीत. भारतानं पटेलांना ओळखलेलं नाही ! तुम्ही 'सरदार' चित्रपट पाहिलात? मी काढलाय तो. सरदार हा माणूस आणि ही बाजू लोकांपर्यंत पोचावी म्हणून.

प्रत्येकाने इथे यशाची भरपूर किंमत चुकती केलीय. कृपया गैरसमज करून घेऊ नका. जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी माझ्या घरी राहून गेलेत; पण मी कधी त्यांच्याकडून काही घेतलं नाही, कधीच मी मागितलं नाही.

**प्रचंड कष्ट आणि त्यागावर कैक वर्षं देऊन उभे केलेले असे सहकारी उपक्रम सध्याच्या वातावरणात सहजच गाळात जातील काय?**

नाही ! अमूलला संपवणं सोपं असणार

त्याप्रमाणे आज त्याचे रोख पैसे चुकते केले जातात. दूध देणारी माणसं त्याच हातानं रोख पैसा घेऊन घरी जातात. शेतकऱ्याच्या घरात ही रोजची नियमित मिळकत म्हणजे मोठी गोष्ट आहे.

सकाळी आणि संध्याकाळी ठराविक वेळेत दूध गोळा केलं जातं. गावकऱ्यांना या वेळा पक्क्या ठाऊक असतात. गावाचं रोजचं आयुष्य सोसायटीच्या वेळांबरोबर जोडलेलं आहे. गोळा केलेलं दूध ताजं रहावं म्हणून सोसायटीच्या चिलिंग युनिटमध्ये ठेवलेलं असतं. तिथून आणंदच्या डेअरीचा ट्रक येऊन घड्याळाच्या काट्याप्रमाणे अचूक ते घेऊन जातो. ट्रकचे रस्ते, प्रत्येक गावात पोचायच्या- निघायच्या वेळा हे सगळं काटेकोर आखलेलं आहे. या ट्रकमार्फतच महत्त्वाच्या मीटिंगा आणि नोटिसांबाबतच्या निरोपांची देवाणघेवाण चालते. या सगळ्या व्यवस्थेत कमालीची शिस्त आहे.

सोसायटी कार्यालयाच्या शेजारच्या मैदानावरच पशुवैद्यक दवाखाना आहे. इथं गन टेक्निकनं जनावरांच्या कृत्रिम गर्भधारणेची सोय केलेली आहे. त्यासाठी उत्तम जातीच्या नरांचं वीर्य कोल्ड स्टोरेजमध्ये उपलब्ध आहे. जनावर माजावर असेल तेव्हा इथं घेऊन येतात. शिवाय दर पंधरवड्याला आणंदमधून सुसज्ज फिरता पशुवैद्यक दवाखाना, म्हणजेच जनावरांच्या तज्ज्ञ डॉक्टरांना घेऊन मोबाइल व्हॅन येते. त्याशिवाय आयत्या वेळच्या अडीअडचणींसाठी चोवीस तासांची, रेडिओसंदेश यंत्रणेसकटची सेवा उपलब्ध आहे. त्यावर कुशल सर्जनही असतात.

याबद्दलचा एक किस्सा खूपच प्रसिद्ध आहे. १९५० मध्ये राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद आणंदची तेव्हाची छोटीशी डेअरी बघायला आले होते. सोसायटीच्या फिरत्या पशुवैद्यक

नाही. माझ्या हयातीची सगळी वर्षं मी इथं वाया नाही घालवलेली ! अमूलची वीट आणि वीट पक्की उभी केलीय. आपण जिथं बसून बोलतोय त्या इन्स्टिट्यूट ऑफ रूरल मॅनेजमेंट (इर्मा) मधून कुरीयन घडवले जातात. किती कुरीयन? वर्षाला ६० कुरीयन ! 'अमूल' या ट्रेडनेमला आख्ख्या देशात प्रचंड मान आहे. या ट्रेडनेमच्या उभारणीसाठी अफाट खर्च केलाय. आज गुजरात मिल्क मार्केटिंग फेडरेशनची सगळ्यात मोठी मालमत्ता म्हणजे हे ट्रेडनेम आहे, डेअरीज नव्हेत. आयटीसीचा अध्यक्ष इथं आला होता. तो हे ट्रेडनेम तीनशे कोटींना विकत घ्यायला तयार होता; पण ते विकण्यासाठी नाही. त्याला अचूक ठाऊक होतं, की महत्त्वाचं काय असेल तर हे ! एरवी कोणी पैसेवाला बावळट अद्ययावत डेअरी उभारू शकतो. बाजारात महत्त्वाची आहे ती पत. आता मी ती कमावलीय. माझी उत्पादनं पाच लाख दुकानांमधून उपलब्ध आहेत. माझ्याकडं दिलेली कुठलीही वस्तू दहा दिवसांच्या आत पाच लाख दुकानांमध्ये पोचते.

माझ्याकडं अतिशय कुशल अशा व्यवस्थापकांचा ताफा आहे. सगळ्या घडामोडी संगणकावर नियंत्रित केलेल्या आहेत. स्टॉक-सेल्ससारख्या प्रत्येक तपशिलासकट दिवसभराच्या उलाढालीची खडान्‌खडा माहिती इथं मला मुख्य संगणकावर मिळते. मी आता को-ऑपरेटिव्हवर नसलो तरी अमूलमधून निवृत्त झालेलो नाही. नेस्ले आणि लिव्हरला गाशा का गुंडाळायला लागतोय? आइस्क्रीमचं काय झालं? वॉल्सचं काय झालं?

'सर्वोत्तम दर्जा आणि स्वस्तात स्वस्त किंमत.' याच्याशी नाही लढता येत. इतकं सोपं आहे ते ! मला नेस्लेसारखा कोणाला डिव्हिडंड द्यायचा नसतो. मीही नेस्लेच्या कुणा व्यवस्थापकाच्या तोडीचाच व्यवस्थापक आहे. (आणि हे विधान फारच नम्र असल्याची मला पक्की जाणीव आहे !) माझ्या कारकिर्दीची सुरवात एका गॅरेजमध्ये झालेली होती. मी एक समाजवादी माणूस आहे. मीही उद्योग चालवतो; पण एक मोठ्ठा फरक आहे. मध्यंतरी धिरूभाई अंबानींबरोबर माझा सन्मान झाला. दुसऱ्या दिवशीची वर्तमानपत्रं म्हणाली, 'कुरीयन अ‍ॅन्ड अंबानी ऑनर्ड...' लाईफटाईम अचिव्हमेंट अ‍ॅवॉर्ड ! 'इकॉनॉमिक टाइम्स'चा जोरदार मथळा... 'इकॉनॉमिक टाइम्स'वाले एक गोष्ट विसरले. धिरूभाई अंबानीने पैसा केला तो स्वतःसाठी. कुरीयनने तो शेतकऱ्यांसाठी कमवला !

**समाजवादी विचारसरणीसाठी, तुमच्या दृष्टीला पुढचा काळ कसा दिसतो?**

भारताची घटना वाचलीयत तुम्ही? घटनेत लिहिलंय, भारत ही एक समाजवादी लोकशाही आहे. सध्याच्या उदारीकरण, जागतिकीकरणाच्या वातावरणात ही गोष्ट विसरून जावीशी वाटली, तरी हे लक्षात ठेवलं पाहिजे, की ते वाक्य आपण घटनेतून काढलेलं नाही. ज्या देशातले चाळीस टक्के लोक दारिद्र्यरेषेच्या खाली जगतात, त्या आपल्या देशात आर्थिक धोरणाचा पाया समाजवादीच असला पाहिजे. हे चाळीस टक्के लोक स्वतःच्या पायावर उभे राहीपर्यंत तुम्हाला त्यांच्या गरजांची काळजी घेतलीच पाहिजे. त्यांना संरक्षण दिलं पाहिजे. तुम्ही बाजाराचे वारे काय ते ठरवतील म्हणून भागणार नाही.

जे लोक आज उलटसुलट बोलतायत त्यांना शंभर कोटी भारतीयांच्या ताकदीची भीती वाटते. एक दिवस येईल, त्या दिवशी भारताचा झेंडा जगातल्या अत्यंत शक्तिशाली देशांच्या जोडीनं फडकेल, याविषयी माझ्या मनात अजिबात शंका नाही. भारतीय माणूस जगाच्या पाठीवर कुठंही गेला तरी सर्वोत्तम राहील. तो हुषार आहे. एका प्राचीन संस्कृतीचा वारस आहे., आपण सत्ता आणि ताकद मिळवूच,

पण मग मला कधी-कधी चिंता वाटते. ही सत्ता, अशी ताकद... ही खरोखर चांगली गोष्ट आहे काय? जगातल्या शक्तिमान देशांकडे आज बघा. अमेरिकेकडेच बघा. त्यांचा माज असह्य आहे. आपण ताकदवान होताना आपल्याला अधिक सहृदय, करुणेचा, माणुसकीचा चेहरा घडवायला शिकायचंय. आपला झेंडा फडकेल त्याच्या बरोबरीनं जगातल्या सगळ्या गरीब देशांचा, सगळ्या उदात्त ध्येयांचा झेंडाही फडकायला हवा. आपल्याला हे शिकायला वेळ थोडाच आहे. आणखी दहा ते वीस वर्षं.

□

दवाखान्याची सुसज्ज चमचमती व्हॅन बघून ते खूपच आश्चर्यचकित झाले होते. ते म्हणाले होते, 'तुमच्याकडे जनावरांची एवढी काळजी घेतायत. आमच्या बिहारमध्ये माणसांसाठीसुद्धा असल्या सोयी नाहीत!' असं सांगतात की नव्याने टीव्ही आला होता, त्या काळात फक्त राष्ट्रपतींसारख्या दिल्लीच्या उच्चपदस्थांच्या घरात कृष्णधवल संच होते आणि इथल्या शेतकऱ्यांच्या कोऑपरेटिव्हमध्ये!

इथल्या दुधाच्या रस्त्यांवरून दुधाबरोबर पैसा फिरतो, तरी कोऑपरेटिव्हच्या कार्यालयांमधून त्याचा भपका जाणवत नाही. या कोऑपरेटिव्ह त्रिभुवनदासाच्या गांधीवादी काटकसरीच्या संस्कारात वाढल्यात. त्रिभुवनदास पटेलांनी कोऑपरेटिव्हची उभारणीच अशी चिरेबंद केलीय, की तिथे गैरशिस्तीला आणि उधळमाधळीला थारा नाही. एका सभासदाला एक व्होट आहे; परंतु प्रामाणिक दूध उत्पादकांशिवाय दुसरा कोणी सोसायटीच्या कामकाजात हस्तक्षेप करू शकत नाही. वार्षिक किमान १८० दिवस आणि किमान ५०० लिटर दूध जो सभासद घालू शकला नसेल, त्याचं व्होट त्या वर्षाला बाद होतं. सोसायटीचे पदाधिकारी प्रशिक्षित असतात. शिवाय वर्षाला चारदा ऑडिट होतं.

विकासाचा खरा अर्थ आहे माणसांचा विकास, या तत्त्वावर त्रिभुवनदास पटेलांसारख्या संस्थापकांची श्रद्धा होती. सोसायटीच्या खिडकीबाहेर गरिबाला आणि श्रीमंताला, हिंदूला आणि बिगर हिंदूंना, स्पृश्य आणि अस्पृश्य जातीतल्या माणसांना आपली पाळी येईपर्यंत निमूट रांगेत उभं रहायला कोऑपरेटिव्हने शिकवलं. ज्या भांड्यात सगळ्यांचं दूध मिसळत होतं, त्यातच भेदाभेद विसर्जित करावं लागलं. कोऑपरेटिव्हच्या

कामकाजातून लोकांना लोकशाही समजू लागली. तशा पंचायतींच्या राजकारणालाही रंग आला. मात्र कोणी कोणाला कोऑपरेटिव्हमध्ये राजकारण आणू दिलं नाही. त्रिभुवनदासांनी बजावलं होतं, 'हे सहकाराचं मंदिर आहे. इथं येताना पक्षीय राजकारणाचे जोडे बाहेर ठेवून यायचं.' त्यांनी स्वतःच्या उदाहरणानं आदर्श घालून दिला. स्वतः सक्रिय काँग्रेसी असूनही पक्षासाठी कोऑपरेटिव्ह राबवली नाही.

सोसायटीच्या वार्षिक फायद्याचा ठराविक हिस्सा ग्रामविकास कार्यक्रमांकडे वळवला जातो. गावासाठी नळ-पाणी, पक्के रस्ते, वाचनालय, शाळा, हॉस्पिटल्स, बालवाड्या,



*विकासाचा खरा अर्थ म्हणजे माणसांचा विकास*

गरीब गरजूंना मदत अशा कामांना त्यातून चालना मिळत गेली. शिक्षण वाढलं, कोऑपरेटिव्हमुळे रोजगार वाढला, माणसं विचार करू लागली. महिलांनी एकत्र येऊन महिलांच्या स्वतंत्र सोसायट्या काढल्या. अशा गुजरातेत मिळून आज ६८९ महिला सोसायट्या आहेत. त्या तडफेनं चालवल्या जातात. जिल्हा संचालक मंडळावर महिला पोचल्या. या घडामोडींचे सामाजिक पडसादही उमटू लागलेत.

भारतीय राजकारणातला खराखुरा एकमेव लोहपुरुष म्हणजे वल्लभभाई पटेल, हे गुजरातचे सुपुत्र. आजही गुजरातवर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाया आहे. वल्लभभाई एका शेतकऱ्याच्या पोटी जन्माला आले. त्यांना ग्रामीण भारत कळत होता. गांधीजींच्या कल्पनेतलं स्वयंपूर्ण गाव ही एक रोमँटिक फँटसी असल्याची त्यांना जाणीव होती. नेहरूंच्या औद्योगिकरणाच्या धोरणाचे हादरे ग्रामीण भारताला बसतील याची त्यांना काळजीही होती. त्यांना गावच्या गरजांना अनुकूल शिक्षण- तंत्रज्ञान अभिप्रेत होतं. उत्पादक शेतकऱ्यांना या शिक्षण- तंत्रज्ञानाची जोड मिळाली आणि उत्पादनाच्या विक्रीसाठी कोऑपरेटिव्ह मॉडेल स्वीकारलं तर त्यातूनच ग्रामीण भारताची उत्क्रांती होईल ही पटेलांची त्रिसूत्री होती.

सरदार पटेलांनी या सकस मातीत जे बी पेरलं, त्याचा वृक्ष बहरलेला पाहण्यासाठी पटेल राहिले नाहीत. त्यांचं स्वप्न अमूलच्या रूपानं साकारलं.

## 'ही तो श्रींची इच्छा'

या मातीतच अमूल घडावी आणि वाढावी सहकाराच्या हातांना यश लाभावं, यामागं जबरदस्त नाट्य आणि उत्कंठा असलेली कहाणी आहे. ती मुळातूनच वाचावी. ज्येष्ठ पत्रकार एम. व्ही. कामथांनी लिहिलेलं अमूलविषयीचं सविस्तर पुस्तक किंवा तेंडुलकर- बेनेगलांचा 'मंथन' प्रसिद्धच आहे. त्याशिवाय रूथ हेरेडिया या तुलनेने अप्रसिद्ध बाईचं 'द अमूल इंडिया स्टोरी' नावाचं १९९ मध्ये आलेलं, म्हणजे त्या मानाने अलीकडचं पुस्तक आहे, तेही सुरेख आहे.

अमूलच्या कहाणीचे नायक ही स्वातंत्र्यपू: काळाच्या मुशीतून जन्मल आलेली बावनकशी माणर होती. त्यांच्यात निश्चयाचं बळ होतं, हाती घेतलेलं कार्य तडीला न्यायची धमक होती, विरोधाशी झुंजायची ईर्षा होती. सहकारमहर्षी त्रिभुवनदास पटेल हे अस्सल देशी व्यक्तिमत्त्व. निःस्वार्थ त्यागाची मूर्तिमंत प्रतिमा. उलट वर्गीस कुरीयन नावाचा काहीसा उद्धट, पाश्चात्य संस्कारातला शहरी, पण विलक्षण धाडसी- बुद्धिमान तरुण. एच. एम. दलाया नावाचा कुरीयनचा दोस्त 'टेक्निकल विझार्ड' शांत स्वभावाचा, भरवशाचा माणूस. हे अमूलचे 'तीन शिलेदार'.

या तिघा शिलेदारांखेरीज अमूलच्या गोष्टीत एक खलनायकही होता. त्याचं नाव दारा खुरोदी. मुंबईच्या 'आरे' या शासकीय दुग्ध वसाहतीच्या कल्पनेचा जनक. मुंबईत पांढऱ्या झाकणाच्या बाटल्यातून जे स्वस्त 'टोन्ड' दूध मिळायचं, तीही खुरोदींची कल्पना. हा शासकीय अधिकारी डेअरी उद्योगाचा तज्ज्ञ होता. पण राग- लोभ तीव्र. डेअरीच्या क्षेत्रात कोऑपरेटिव्ह प्रयत्न यशस्वी होऊच शकत

नाही, यावर खुरोदी ठाम. तेवढ्यापोटी अमूलच्या वाटचालीत त्यानं जागोजागी लाल फीत उभी केली. अमूलवाल्यांना पुरतं जेरीस आणलं. खुरोदींनाही 'पद्मभूषण' मिळालं. इतकंच नव्हे तर कुरीयन आणि त्रिभुवनदासांना त्यांचा मॅगसेसे पुरस्कार याच खुरोदीसह वाटून घ्यावा लागला. थोडक्यात, या गोष्टीचे नायक-खलनायक ही तशीच तोलामोलाची माणसं होती. त्यांच्यात व्यावसायिक ईर्षा जबरदस्त होती, तरी वैयक्तिक कटुता नसावी. अमूलनं तर पोल्सनशीही वागताना वैरभाव बाळगला नाही.

राजकारण्यांनी क्वचित अमूलची पंचाईत केली, तरी कित्येक अवघड अशा पेचप्रसंगातून अमूलच्या राजकीय लागेबांध्यांनी त्यांना तारलं. अमूलच्या दुधाला आणि इतर उत्पादनांना मुंबईसारखी मोठी बाजारपेठ जवळ होती, हाही घटक महत्त्वाचा आहे. एकंदरच शेतकऱ्यांच्या या कोऑपरेटिव्हबद्दल कैक व्यक्तींच्या मनात असलेली आपुलकीची भावना हेदेखील अमूलचं भांडवल होतं. पण या पलीकडे अवघड काळात असे काही थक्क करणारे योगायोग अमूलच्या वाट्याला आले, की रूथ हेरेडी यांना तो दैवी संकेताचा भाग वाटला. या ठिकाणी शिवाजीमहाराजांच्या स्वराज्य उभारणीच्या काळात तोरण्याच्या पायथ्याशी घन सापडले, त्या प्रसंगाची आठवण होतेच. 'स्वराज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा' होती. तद्वतच गुजरातच्या कष्टाळू शेतकऱ्याला न्याय मिळावा, ही श्रींचीच इच्छा असावी. या शेतकऱ्यांनी पुष्कळ वनवास भोगलेला होता. यातला स्वदेशीचा आणि श्रद्धेचा भाग बाजूला ठेवला, तरी त्या आश्चर्यकारक योगायोगांमुळे अमूलची कहाणी एखाद्या ॲक्शनपटासारखी रंगतदार होते यात शंका नाही.

आपण इतिहास घडविल्याची जाणीव अमूलला आहे. हा इतिहास जपण्याचं भानही त्यांच्याकडे आहे. याचा पुरावा आहे अमूलचं देखणं, भव्य म्युझियम. या म्युझियममध्ये वल्लभभाईंचं पत्र आहे. अमूल डेअरीचं उद्घाटन पंतप्रधान नेहरूंनी ज्या चावीनं केलं ती चावी आहे. कुरीयनने दारा खुरोदीकडून जिंकलेल्या पैजांच्या वस्तुरूप आठवणी आहेत. कुरीयन आणि कोऑपरेटिव्हला मिळालेले असंख्य पुरस्कार आहेत. पण जाणवावी अशी एक उणीवही आहे. त्रिभुवनदास पटेलांचा गर्दीतला क्वचित एखादा फोटो वगळता त्रिभुवनदासांचं म्हणून या म्युझियममध्ये काहीही नाही.

या थोर माणसाचं स्वतःचं असं काही नव्हतंच. त्यांनी आपल्या एकाही नातेवाइकाला अमूलमध्ये नोकरीला लावलं नाही. त्यांचा एक मुलगा डेअरी तंत्रज्ञान शिकू शकला तेही याच अटीवर, की त्याने अमूलमध्ये नोकरी करायची नाही. या गोष्टीवरून कुरीयनने त्रिभुवनदासांशी वाद घातला. तेव्हाचे त्यांचे उद्‌गार तेजस्वी आहेत. ते म्हणाले, 'शेतकऱ्यांचा कोऑपरेटिव्हवरचा विश्वास कशानेही ढळता कामा नये!' त्यांच्या या असीम कर्तृत्वाची जाणीव म्हणून नंतर 'त्रिभुवनदास फाउंडेशन' ही लोकोपयोगी संस्था उभारण्यात आली.

त्रिभुवनदासांच्या व्यक्तिमत्त्वाभोवतीच कुरीयन आणि दलायासारखे तरुण आकर्षित झाले आणि आणंदसारख्या आडगावी येऊन राहिले.

वर्गिस कुरीयन हो व्यवस्थापन क्षेत्रातील आजची जितीजागती दंतकथा, 'दुधाचा महापूर' योजनेचे शिल्पकार, अमूलच्या यशाचे अधिकारी. त्यांच्या तरुणपणातल्या काही गोष्टी इथं सांगितल्याच पाहिजेत. हा केरळी तरुण खरं तर सैन्यात जायचा. त्याच्या आईच्या विरोधामुळे ते बारगळलं. टिस्कोतली नकोशी नोकरी सोडायला तो कारण शोधत होता. त्या वेळी भारत सरकारनं तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात ५०० शिष्यवृत्त्या जाहीर केल्या होत्या. कुरीयनने अर्ज भरला आणि तो मुलाखतीसाठी गेला.

'पाश्चरायजेशन म्हणजे काय?' एवढा एकच प्रश्न मुलाखतीत त्याला विचारला गेला. शाळेत शिकलेलं काहीतरी आठवत कुरीयननं जेमतेम उत्तर दिलं, 'ठराविक तापमानाला दूध उकळण्याची प्रक्रिया'.

'धन्यवाद', समोरचा अधिकारी म्हणाला, 'तुला डेअरी अभियांत्रिकीसाठी निवडलंय.' तर या डेअरीमहर्षीचा डेअरीच्या क्षेत्रातला प्रवेश झाला तो हा असा. भयंकर अनिच्छेनं कुरीयननं ही शिष्यवृत्ती स्वीकारली. मिशिगनला जाऊन तो डेअरीच्या विषयातलं काहीही शिकायला राजी नव्हता. त्यानं तिथं मेकॅनिकल अभियांत्रिकीची पदवी मिळवली. नावापुरता ३ महिन्यांचा डेअरीचा अनुभव घेऊन तो परतला. मात्र तिथं त्याला एक मित्र भेटला तो दलाया. शिष्यवृत्तीपायी कुरीयननं सरकारी सेवेचा बाँड लिहून दिला होता. त्यातून सहज सुटका होईना. अशाच वैतागात सरकारी पोस्टिंगवर तो आणंदला दाखल झाला.

तिथे निव्वळ कंटाळा घालवायला उद्योग म्हणून त्याने शेतकऱ्यांच्या कोऑपरेटिव्हच्या मालकीचा जुनाट सेकंडहँड पाश्चरायजर दुरुस्त करायला सुरवात केली. ही मशिनरी एवढी कंडम होती की कुरीयनही विटला. त्याने त्रिभुवनदास पटेलांना स्पष्ट सांगितलं, की आधी ही मशिनरी भंगारात काढा. त्रिभुवनदासांचा या तरुणावर विश्वास बसलेला होता. पेन्सलचं झिजलेलं शेवटचं टोक पुरवून वापरणाऱ्या त्रिभुवनदासांना कुरीयननं त्या काळात पन्नास हजारांचा नवा प्लेट पाश्चरायजर घ्यायला लावला आणि तोच कुरीयनला नडला.

'मी या महिन्यात आणखी एक फुकटचा पगार घेतला. मला मोकळं करा,' अशी दर महिना वरिष्ठांना पत्र घालणाऱ्या कुरीयनला अखेर सुटकेची संधी मिळाली. तो ज्या प्रकल्पावर आला होता, तो प्रकल्पच सरकारनं मोडीत काढला. कुरीयननं आनंदानं बॅग भरली. तोच त्रिभुवनदास हजर.

त्यांनी कुरीयनला विचारलं, 'तुझ्या सांगण्यावरून आम्ही एवढी महागाची मशिनरी घेतली. आमच्या लोकांना ती चालवताही येत नाही. अशा परिस्थितीत तू आम्हाला टाकून जाणं योग्य आहे काय?'

कुरीयन मान खाली घालून खरेपणाने उत्तरला, 'नाही. बरोबर नाही.'


तिथेच त्रिभुवनदास पटेलांनी या तरुणाला कोऑपरेटिव्हचा पगारी माणूस म्हणून मिळवला. 'दोन महिन्यांसाठी राहतो' म्हणालेला कुरीयन तिथलाच झाला.

कुरीयन १३ मे १९४९ ला आणंदला दाखल झाले, तेव्हा त्यांची राहण्याची व्यवस्था एका जुन्या मोटर धुण्याच्या लहानशा गॅरेजमध्ये केली होती. त्या गॅरेजची प्रत्येक वीट सांभाळून आणून अमूलमध्ये या गॅरेजची प्रतिकृती जशीच्या तशी उभारलीय. वर पाटी लावलीय. कुरीयन यांच्या वैभवशाली कारकिर्दीची सुरवात या गॅरेजमधून

पान ५२ पाहा

# ☐ 'अमूल'ची यशोगाथा

पान १५ वरून



*स्वयंचलित यंत्रं आणि सगळ्या व्यवस्थेत कमालीची शिस्त*

झाली. या गैरेजची अवस्था बघताना त्या काळात उच्चविद्याविभूषित कुरीयन यांनी केलेला 'त्याग' वगैरेंच्या अपेक्षित प्रतिमा डोळ्यांसमोर येतात. पण अमूलची हकिगत वाचताना नीट विचार केला तर जाणवतं, की तरुण कुरीयनच्या अंगात रग एवढी होती की त्याला सोपं, सुखासीन आयुष्य मानवलं नसतं. त्याला हवं होतं एक आव्हान.

ही रग शमविण्याची पुरेपूर संधी कुरीयनना या कोऑपरेटिव्हने दिली.

## अमूल डेअरी ते 'आणंद पॅटर्न'

अमूलची डेअरी म्हणजे सहकाराची पंढरी. ती बघायला लांबून लोक येतात. डेअरीच्या परिसरात कमालीची स्वच्छता आणि शांतता आहे. प्रत्यक्ष प्लान्टचा भाग जवळजवळ निर्मनुष्य आहे. काचेतून पूर्णपणे स्वयंचलित अजस्र मशिनरी दिसते. प्रचंड लोण्याचा ढीग, सरकत्या पट्ट्यांवरून आटोपशीर वड्यांच्या आकारात सरकत आपोआप पाकिटात बंद होतो अशा धर्तीची दृश्यं. या सगळ्या यंत्रणेवर नियंत्रण करणारा संगणक कक्ष दिसतो. कुठल्याही आधुनिक प्लान्टप्रमाणे इथली सगळी ठलाढाल अमूर्त भासते.

युरोपाच्या डेअरीवाल्यांना काळी म्हैस दुभतं जनावर म्हणून फारशी ठाऊक नाही. पाश्चात्त्य देशांत डेअरीचं संपूर्ण तंत्रज्ञान गायीच्या दुधावर प्रक्रिया करण्यासाठी विकसित झालं. म्हशीच्या आणि गायीच्या दुधाच्या घडणीत फरक आहे, तो त्या त्या दुधामध्ये असलेल्या प्रथिनांच्या स्वरूपामुळे. म्हशीच्या दुधापासून चीज आणि दूधपावडरीसारखी उत्पादनं बनवणं शक्य आहे ही गोष्ट पश्चिमी जगाला सहजी पटली नव्हती. भारतात अमूलनं पहिल्यांदा म्हशीच्या दुधापासून इतक्या मोठ्या प्रमाणावर व्यापारी उत्पादन यशस्वी करून दाखवलं. त्यासाठी स्वतंत्र तंत्रज्ञान उभं केलं. ही अमूलची सगळ्यात मोठी कामगिरी.

परस्परात गुंफलेले चार हात हे खेडा जिल्हा दूध उत्पादक संघाचं मानचिन्ह आहे. हे चार हात कोऑपरेटिव्ह मॉडेलच्या यशामागच्या चार महत्त्वाच्या घटकांचं प्रतिनिधित्व करतात. पहिला आहे दूध उत्पादक शेतकरी. दुसरं आहे ते आधुनिक अग्रेसर तंत्रज्ञान, तिसरा घटक आहे धोरणी मार्केटिंगचा आणि चौथा आहे तो ग्राहकराजा. उत्पादक आणि ग्राहकादरम्यानच्या दलालांना या साखळीत स्थान नाही. शेतकऱ्यांची कोऑपरेटिव्ह आपणच व्यावसायिक व्यवस्थापकांच्या कौशल्यातून आपली उत्पादनं ग्राहकांपर्यंत नेते. उत्पादकांना यातून नफ्याचा थेट हिस्सा मिळतो आणि मधली दलाली नसल्यामुळे ग्राहकालाही किंमत स्वस्त बसते.

डेअरी ही तंत्रज्ञानाची फलश्रुती आहे आणि मार्केटिंगची प्रतिनिधी आहे, ती गुजरात कोऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशन. दलायासारख्या कसबी इंजिनिअर्सनी डेअरीची तांत्रिक आघाडी सांभाळताना कैक अवघड आव्हानं लीलया पेलली आणि व्यवस्थापन सांभाळलं कुरीयननी. दुधाच्या मार्केटिंगपासून नंतर दुग्धजन्य पदार्थांच्या उत्पादनात घेतलेली यशस्वी उडी, प्रतिस्पर्ध्यांना दिलेली यशस्वी टक्कर, वेळोवेळी घेतलेल्या हिशेबी जोखमी, त्या पार पाडताना पणाला लागलेली प्रतिष्ठा, तेजी- मंदी सोसण्याची ताकद, हुशारीने मिळवलेली भांडवली मदत, विस्ताराची महत्त्वाकांक्षा, वितरणासाठी व्होल्टाससारख्या खासगी कंपनीबरोबर केलेली सावध साथ ही सगळी डॉ. कुरीयन यांच्या गौरवग्रंथाची रोचक प्रकरणं ठरतील.

आपली उत्पादनं बाजारात आणताना ट्रेडनेम म्हणून 'अमूल' कुणाला सुचलं ते आता कोणालाच आठवत नाही. पण त्याचा अर्थ होता 'अमूल्य', हे सुटसुटीत, बाळसेदार वाटणारं नाव आणि अमूलच्या कल्पक जाहिराती कोऑपरेटिव्हला चांगल्याच फायद्याच्या ठरल्या. खेडा जिल्हा दूध उत्पादक संघाच्या धर्तीवर गुजरातच्या इतर जिल्ह्यांमधूनही कोऑपरेटिव्ह उभ्या राहिल्या. मेहसाणाची 'दूधसागर' डेअरी, सुरतेची 'सुमुल' डेअरी अशा अनेक अमूलने त्यांना लागेल ती मदत पुरवली. समंजस मोठ्या भावाची भूमिका घेतली; परंतु गुजरातच्या या जिल्हा कोऑपरेटिव्हजमधली स्पर्धा धंद्याच्याच मुळावर येईल, हे लक्षात आलं तेव्हा मोठ्याने लहानाला गिळंकृत करण्याऐवजी सगळ्या लहान मोठ्यांनी एकत्र येऊन आपली उत्पादनं एकत्रितपणे विकायचं ठरवलं. उत्पादक जिल्हा युनियनची मिळून एक मार्केटिंग फेडरेशन

काढली. हा सहकाराच्या तत्त्वाचा मोठा विजय होता. १९७३ मध्ये वर्गीस कुरीयन यांनी अमूलचा राजीनामा दिला आणि ते गुजरात कोऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशनचे अध्यक्ष झाले.

स्वच्छ व्यावसायिक दृष्टीनं कारभार केला, तर कोऑपरेटिव्ह व्यवस्थापन कुठल्याही कॉर्पोरेट व्यवस्थापनाच्या तोडीनं उभं राहू शकतं, ही गोष्ट आजवर या फेडरेशननं पुरेशी सिद्ध केलीय. कुरीयन यांच्या व्यवस्थापन कौशल्याचा एक भाग म्हणजे सरकारी नोकरशाहीला विरोध करताना कोऑपरेटिव्हच्या अंतर्गत एक नवी नोकरशाही निर्माण होऊ नये म्हणून ते दक्ष राहिले. अमूलच्या आणि फेडरेशनच्या वातावरणात अशा उपक्रमांमध्ये सहसा अपेक्षित नसलेला व्यावसायिक अभिमान, चटपटीतपणा जाणवतो तो याचमुळे. डॉ. वर्गीस कुरीयन म्हणतात, 'आपण एक चौकट उभी केली हे जाणवताक्षणी ती मोडून टाकण्याचं धैर्य व्यावसायिकाच्या अंगात हवं. खरा व्यावसायिक (प्रोफेशनल) तो जो आपल्या अंगच्या कौशल्याचा वापर समाजाच्या हितासाठी करतो. आजच्या काळात आपण निव्वळ उत्कृष्ट असून भागणार नाही. टिकून राहण्यासाठी नेहमीच एक पाऊल पुढे ठेवण्याची अंतःप्रेरणा हवी.'

लालबहादूर शास्त्री पंतप्रधान असताना त्यांनी आणंदला भेट दिली होती. शास्त्रीजी धोरणी होते. आणंदच्या सहकारी मॉडेलमधली ऊर्जा त्यांना जाणवली होती. आणंदच्या धर्तीवर देशभरात इतरत्रही प्रयत्न व्हायला हवेत. 'आणंद पॅटर्न' ग्रामीण विकासाचं उत्तम साधन ठरू शकेल हे ओळखून त्यांनी या कामी नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाची नियुक्ती केली. बोर्डाचं काम दिल्लीच्या नोकरशाही परिघातून चालविण्यापेक्षा ही संस्था आणंदमधून चालविण्याचा विश्वास शास्त्रीजींनी दाखवला. आणंदच्या कोऑपरेटिव्हनं जी कौशल्यं विकसित केली होती, त्याच पायावर ही संस्था उभी राहिली.


## कल्पना हेच भांडवल

नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाची कामगिरी, बोर्डाच्या अखत्यारित चालवलेली 'ऑपरेशन फ्लड' योजना हा स्वतंत्र आणि सविस्तर विषय आहे. त्याची चर्चा इथं करणं शक्य होणार नाही. लक्षात घ्यायच्या दोन-तीन गोष्टी अशा, की कुरीयन यांच्या मुरब्बी नेतृत्वामुळे बोर्डानं जे काही साध्य केलं ते तिथं एखादा प्रशासकीय अधिकारी बसवून साधणं कठीण होतं. पंतप्रधानांनी बोर्ड नेमलं तरी बोर्डाला लागणारा पैसा नव्हताच. अशा वेळी सरकारच्या तोंडाकडे पाहण्यापेक्षा बोर्डाने सशुल्क कन्सल्टन्सी करून स्वावलंबी बनावं, ही दिशा अचूक ठरली. बोर्डाकडे भांडवल नव्हतं. आपल्या डोक्यातली कल्पना हेच भांडवल मानून बोर्डानं इथवरची वाटचाल केलीय.


भारतीय डेअरीचं क्षेत्र वाढविण्यासाठी नवी देशी उत्पादनं बाजारात यायला हवी होती. यांच्या निर्मितीपासून पॅकेजिंगचं तंत्र बोर्डाच्या रिसर्च टीमनं विकसित केलं. एक छोटं उदाहरण द्यायचं ते गुलाबजामचं. परदेशात मटणाचे गोळे ज्या यंत्राने पाडतात, त्यातच सुधारणा घडवून या लोकांना गुलाबजाम पाडायचं सुचलं (मीटबॉल शेपर) आणि तिथे डोनट्स ज्या यंत्रात तळतात, तशाच पद्धतीचा 'फ्रायर'मध्ये वापरला. आज असे पाकातले गुलाबजाम भारतीय बाजारपेठेत मिळतात. चांगल्या पॅकिजिंगमुळे त्यांचं लाइफ सहा महिन्यापर्यंत वाढवणं शक्य झालंय.

सत्तरच्या दशकात डेअरीला लागणारी यच्चयावत यंत्रसामग्री आपण आयात करीत असू. आज या क्षेत्रात पावणेदोनशे भारतीय कंपन्या उभ्या राहिल्यात. आज ९५ टक्के डेअरी मशिनरी आपण देशात तयार करतो. नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाच्या अभियांत्रिकी विभागाच्या कर्तबगारीला याचं मोठं श्रेय जातं.

युरोपात डेअरी उत्पादनांच्या क्षेत्रात जी मंदी आली होती, त्या काळात आपण तिथलं सरप्लस उत्पादन मदतीच्या स्वरूपात पदरात पाडून घेतलं आणि 'ऑपरेशन फ्लड' योजनेअंतर्गत आपल्या दूधपुरवठा योजना सक्षम करण्यासाठी हुशारीनं वापरलं. (तिथलं सरप्लस बाजाराच्या रस्त्यानं घरात घेऊन इथल्या दुधाची स्थानिक बाजारपेठ कोलमडू दिली नाही!) हा काळ डॉ. वर्गीस कुरीयन यांच्या कारकिर्दीतल्या सर्वांत वादग्रस्त काळ होता. 'ऑपरेशन फ्लड' योजना भरपूर



अडचणींमधून गेली. तिच्यावर टीकाही भरपूर झाली. याच काळात कुरीयन यांची प्रतिमा कठोर आणि निर्मम प्रशासकाची होत गेली.



'ऑपरेशन फ्लड' काय प्रकरण होतं? 'दूध ही नाशवंत वस्तू आहे. त्यात उन्हाळ्यात जनावरं कमी दूध देतात आणि हिवाळ्यात जास्त. अशा कमी-जास्त पुरवठ्याच्या काळात बाजारपेठ काही लहान- मोठी करता येत नाही. याचा तोल साधणारी काहीतरी यंत्रणा हवी, जी हिवाळ्यातलं उत्पादन टिकवून पुढे नेण्यासाठी मदतीला येईल. या भूमिकेतून विचार करणं, योजना आखणं, राबवणं हे 'ऑपरेशन फ्लड'चं उद्दिष्ट होतं.' - कुरीयन.

सोपेपणानं सांगायचं तर हेच आहे. दुधाच्या महापुराचं यश- अपयश याची चर्चा तेव्हाही झाली, पुढेही होत राहील. डोळ्यांसमोर कोकणाचं उदाहरण येतं. तेच इथं समारोपासाठी चालू शकेल. वीस वर्षांपूर्वी कोकणात दुधाचे खूप हाल होते. शेजारी कोणाचं दुभतं जनावर आहे का ते बघून ठेवायला लागे. चहापुरतं दूधही कैक घरात मुश्किलीनं असे.

आज गेलात तर परिस्थिती निश्चित बदललेली दिसते. छोट्या प्लॅस्टिक पिशव्यांमधून सहकारी संस्थांचं दूध सहजपणे उपलब्ध आहे.

या धवलक्रांतीची ठिणगी १९४६ च्या कोऑपरेटिव्ह चळवळीत होती, हे नक्कीच म्हणता येईल. ◆

# छोट्या जाहिराती

## विवाहविषयक

आळंदीला जायची गरज नाही. जमलेल्या प्रेमविवाहाना कायदेशीर, धार्मिकही समाजिकही अत्यल्प खर्चात, आंतरजातीय, आंतरधर्मीयही, पालकांच्या विरोधातही, सत्वरही दाखल्यासह केल्याही. डॉ. भवाळकर, फोन ४४५७०९५.

फक्त ब्राह्मण शाखेतील घटस्फोट, उच्चशिक्षित वधू-वरांच्या स्थळांसाठी पुण्यातील प्रसिद्ध सुमंगल वधू-वर, गोखले, १२०२, सदाशिव, तिलकवाडी, ४४७९२३०. लग्नाचे वय हिशोबाप्रमाणे वाढते.

अपंगांसाठी लक्ष्मी विवाह केंद्र: कोड, मूकबधिर, पोलिओ, आंधळे, विधवा, घटस्फोटित, उशिरा विवाह, तसेच उच्चशिक्षित, उच्चवर्णीय, सर्व जातीतील अपंग स्थळांसाठी- चंद्रप्रभा कुलकर्णी, लक्ष्मी सदन, ५४२, रास्ता, पुणे ११. ६१३७५४१, दाभोळकर पुलाजवळ.

शहाण्णवकुळी मराठा वधू/वर परिचय संमेलन- २४ मार्च/ वातानुकूलित हॉटेल कल्याण, पिंपरी-पुणे, धार्मिक नोंदणी जारी. मुख्यालय- प्रतापराव वासनकर, ७०, मुंडेनगर, नागपूर. फोन- २२७८४२, ९८२३२८७०६८. पुणे शाखा- सुधाकरराव दमडे, ४००१४९०.

● मुलगा लग्नाचा मुलगा अजाणता जन्म आहे, पण वैवाहिक जीवनाचा जोडीदार त्याला कमी हवा, पाककिला पात ते स्वतः आहे हे लक्षात घेऊन वधू संशोधनासाठी, कार्यपद्धतीबद्दल चर्चाचे संपर्कात वर्किंग- रोहिणी, प्लाझा हाउस, टिळक रोड, पुणे, ४४७७१९८.

केवळ जात, धर्म, उंची, शिक्षण, रूप यावरूनच अनुरूपता ठरते असे नाही, तर आचार-विचार आणि कौटुंबिक जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन यातही अनुरूपता असावी यासाठीच, कार्यपद्धतीसाठी- संपर्क, रोहिणी, प्लाझा हाउस, टिळक रोड, पुणे. ४४७७१९८

पैठणी जनकल्याण : सर्व जातीतील वधू-वरांसाठी मुंबई, नाशिक, पिंपळगाव २० शाखा शाखांमध्ये एकाचवेळी नोंदणी. पुणे. संपर्क- जयश्री- 4222120, मुंबई- 5447326, 9-1

मराठा वधू-वर सूचक केंद्र ! भागूर स्थळांसाठी विवाहासाठी पत्रिका/ छायाचित्र पाठवा. स्थळे, वेबसाईटवर प्रसिद्धी. २१ एप्रिलला नाशिकला मेळावा. सुदाम शिंदे, गणेश कॉम्प्लेक्स, बोरसाईकर, धनकवडी, पुणे ४३. ०२०-४३७०१५४, अण्णासाहेब शिंदे, पंचवटी, नाशिक ५, मोबाईल ९८२२०-४०२२, वेबसाईट- www.marathamarriage.com

सून असो वा जावई, पालकांच्या अपेक्षा आवाक्यात, अपेक्षेनुरूप सर्वजातीय स्थळे मिळण्यासाठी- 'अक्षदा', २७९, नारायण पेठ, निघोजकर मारुती मंदिरामागे, पुणे ३०. फोन- ४४५७०९५.

## वधू-वर

लक्ष्मीनारायण वधू-वर सूचक संस्था. सर्व जातीतील स्थळांकरिता- २ घेलक हाईट्स, फेब्रुवारी, कोथरूड, पुणे २९. संपर्क- ऑफिस- ५३८७८१८. घर ५५३००१६. (११-२) (५-७)

## वर पाहिजे

सुतार वधू- २१, १५४, पदवीपूर्व, पार्लर व्यवसाय, सुतार- २५, १६०, डिप्लोमा, कॉम्प्युटर डिप्लोमा, २,०००/-. सुतार- २७, १५२, पदवीधर, ५,०००/-. स्नेहप्रभा- ०२०-४४८४४५०.

देशस्थ ब्राह्मण वधू- २५, १५७, B.Com. ३०००/-. देशस्थ २७, १६०, B.A. २५००/-. देशस्थ २३, १५७, B.Sc. नोकरीत. स्नेहप्रभा, फोन ०२०-४४८४४५०

मराठा वधू- २३, १६८, B.E. १२,०००/-. मराठा- २५, १५२, B.A., निमसरकारी नोकरीत. मराठा- २९, १५४, M.Com., नोकरीत,९,०००/-. स्नेहप्रभा, फोन- ०२०-४४८४४५०.

सोनार वधू २६, १६०, M.A. D.Ed. ७,०००/-. सोनार २२, १५७, B.Sc. ३,५००/-. सोनार २५, १५४, B.E. १२,०००/-. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पेरूगेट, पुणे ३०.

कोष्टी वधू- २७, १५४, M.Sc., नोकरीत. कोष्टी- २४, १५७, B.E. नोकरीत. कोष्टी- २३, १५४, B.A. नोकरीत, १,५००/-. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पेरूगेटापाशी, पुणे ३०.

कोकणस्थ ब्राह्मण वधू- २५, १६३, M.B.A., कोकणस्थ- २५, १५५, डॉक्टर B.A.M.S. कोकणस्थ- २४, १६५, B.E. उत्तम पगार. कोकणस्थ २१, १५२, डॉक्टर B.D.S. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पुणे ३०.

राजपूत वधू- २७, १५२, M.Com. कॉम्प्युटर कोर्स ४,०००/-. राजपूत २६, १६५, M.A. शासकीय नोकरीत. राजपूत २३, १६०, डिप्लोमा, नोकरीत, ४०००/-. स्नेहप्रभा- ०२०-४४८४४५०.

कोकणस्थ ब्राह्मण वधू- २४, १६०, डिप्लोमा, इंजिनिअर कंपनीत. कोकणस्थ २३, १५४, M.B.B.S. कोकणस्थ २६, १६३, B.E., लेक्चरर. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पेरूगेट, पुणे ३०.

मराठा वधू- २७, १६५, B.E. २०,०००/-. मराठा- २५, १५२, B.Com. कस्टमर ५,०००/-. मराठा- २४, १५४, M.A. D.Ed. ६,०००/-. स्नेहप्रभा- ०२०-४४८४४५०.

शिंपी वधू- २२, १६०, C.A., शिंपी- २४, १५७, B.A. नोकरीत. शिंपी- २६, १६०, B.C.S. नोकरीत. शिंपी- २३, १६५, डिप्लोमा इंजिनिअर, नोकरीत. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पेरूगेट, पुणे ३०.

देशस्थ ब्राह्मण वधू- २४, १५४, M.Lib. १०,०००/-. देशस्थ वधू- २७, १६४, B.Sc. ६,०००/-. देशस्थ- २५, १६०, B.E. लेक्चरर. स्नेहप्रभा- ०२०-४४८४४५०.

दैवज्ञ ब्राह्मण वधू- २६, १५७, G.D. Art. ७,०००/-. दैवज्ञ- २५, १५२, B.E. 20,000/-. दैवज्ञ- २१, १५०, टेक्निकल कोर्स, कंपनीत. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पेरूगेट, पुणे ३०.

माळी वधू- २६, १५४, B.E. ७,०००/-. माळी- २४, १६५, B.Pharm. १०,०००/-. माळी- २३, १५२, डॉक्टर, B.A.M.S. ५,०००/-. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पुणे ३०.

देशस्थ ब्राह्मण वधू- २५, १५७, B.Com. ३,०००/-. देशस्थ- २०, १६५, बारावी, मराठी नोकरीत. देशस्थ- २८, १५४, B.Com., बँकेत, ८,०००/-. स्नेहप्रभा- ०२०-४४८४४५०.

भंडारी वधू- २९, १६५, पदवीधर, नोकरीत. भंडारी- २४, १६७, M.Sc., ३०००. भंडारी- २५, १६५, L.E., १२०००/-. स्नेहप्रभा, फोन- ०२०-४४८४४५०.

सोनार वधू- २५, १६७, M.B.A. सोनार २५, १५२, M.Pharm. सोनार २६, १६०, B.E. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पेरूगेटापाशी, पुणे ३०.

मराठा वधू २१, १५२, B.A. मराठा ३०, १६३, D.Ed. सरकारी नोकरीत. कोकणस्थ मराठा- २५, १५७, B.E. नोकरीत. स्नेहप्रभा, फोन- ०२०-४४८४४५०.

देशस्थ ब्राह्मण वधू- २७, १६०, डॉक्टर B.A.M.S. देशस्थ- २३, १६०, M.M.S. ४०७०/-. देशस्थ- २६, १६०, B.Sc. बँकेत. स्नेहप्रभा, फोन- ०२०-४४८४४५०.

देशस्थ ब्राह्मण वधू- २६, १५७, M.B.A. नोकरीत. देशस्थ- २२, १७०, M.Com. २०००/-. देशस्थ- २४, १५७, B.Com. बँकेत. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पेरूगेटापाशी, पुणे ३०.

बौद्ध वधू- २६, १६५, B.Com. बँकेत. बौद्ध- २५, १६०, फॅशन डिझायनिंग, ५०००/-. बौद्ध- २७, १६०, B.Tech. लेक्चरर. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पेरूगेटापाशी, पुणे ३०.

बौद्ध वधू- २६, १६३, B.Com. शिक्षिका. बौद्ध- २२, १६३, B.A. ३०००. बौद्ध- २६, १५७, डॉक्टर M.D. स्नेहप्रभा, पेरूगेटापाशी, पुणे ३०.

सोनार वधू- २८, १५७, B.Sc. २५०००/-. सोनार- २३, १६५, डॉक्टर B.A.M.S. सोनार- २३, १६०, B.E. उत्तम पगार. स्नेहप्रभा, फोन ०२०-४४८४४५०.

सुतार वधू- २३, १५२, B.Com. सुतार- २८, १६०, B.Sc. १०,०००/-. सुतार- २०, १५७, पदवीधर. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पेरूगेटापाशी, पुणे ३०.

शिंपी वधू- २५, १६७, I.T.I., १०,०००/-. शिंपी- २८, १६५, B.Com. ५०००/-. शिंपी- २३, १६५, B.E. २५०००/-. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पेरूगेटापाशी, पुणे ३०.

देशस्थ ब्राह्मण वधू- २४, १६३, LL.B. टॅक्टिस. देशस्थ- २२, १६०, पदवीधर. देशस्थ- २३, १६५, डॉक्टर B.H.M.S. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पेरूगेटापाशी, पुणे ३०.

कायस्थ वधू- २७, १५५, डॉक्टर M.S. कायस्थ- २४, १६३, M.B.A. नोकरीत. कायस्थ- २२, १६५, B.Com. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पेरूगेटापाशी, पुणे ३०.

मराठा वधू- २६, १६३, B.Ed. मराठा- २८, १५७, बारावी कॉम्प्युटर ३०००/-. मराठा- २२, १५७, B.Com. नोकरीत. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पेरूगेटापाशी, पुणे ३०.


कोकणस्थ ब्राह्मण वधू- २२, १६०, फिजिओथेरपिस्ट. कोकणस्थ- २८, १५७, M.Phil. ७५००/-. कोकणस्थ- २२, १६१, B.A. स्नेहप्रभा, फोन- ०२०-४४८४४५०.

कोळी वधू- २५, १६३, B.E. लेक्चरर. कोळी- २३, १५२, M.A. कोळी- २४, १५७, कॉम्प्युटर डिप्लोमा. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पेरूगेटापाशी, पुणे ३०.

मराठा वधू- २५, १६०, B.Sc. मराठा- २७, १५२, B.Com. नोकरीत. मराठा- २२, १६०, B.A. स्नेहप्रभा, ११४७, सदाशिव, पेरूगेटापाशी, पुणे ३०.

# शुभ्र काही जीवन गाणे

## यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार-२००१ चे मानकरी



भारतातील धवलक्रांतीचे जनक डॉ. व्ही. कुरियन

पांढऱ्या शुभ्र दूधाचा महापूर ज्या राज्यामुळे साऱ्या देशात पसरला त्याच गुजराथ राज्यात लाल रक्ताचे पाट वाहत असलेले अलिकडे आपण बघितले. ज्या पांढऱ्या मीठाच्या सत्याग्रहामुळे कोट्यावधी भारतीयांना स्वातंत्र्याची प्रेरणा मिळाली तो सत्याग्रह ज्या गुजराथ राज्यात झाला, जिथे महात्माजींची अहिंसेची चळवळ फुलली त्याच साबरमतीच्या काठावर माणुसकीचे लचके तोडताना आपण पाहिले. असा दुर्दैवी विरोधाभास पचवणं कठीण होत असतानाच १२ मार्च २००२ रोजी गुजराथ मधल्याच एका अनोख्या व्यक्तिमत्वाला सन्मानित करण्याचा योग येत आहे. दुःखात सुद्धा आनंद साजरा करावा असा हा दिवस आहे. कारण ज्या व्यक्तीमत्वाला यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. त्या व्यक्तीने अशी अनेक आव्हाने पचवून विधायक कार्याचा एक आदर्श नमुना जगापुढे पेश केला आहे. म्हणूनच गुजराथमधल्या सध्याच्या भीषण विध्वंसक दंगलीच्या पार्श्वभुमीवर डॉ. वर्गीस कुरीयन यांच्या विधायक कार्याची नोंद घेतली पाहिजे.

सर्व साधारणपणे भारतीय माणसाच्या दिवसाची सुरवात चहाच्या किंवा कॉफीच्या पेल्यापासून होत असते आणि बऱ्याच जणांच्या दिवसाचा शेवट सुद्धा दूधाच्या पेल्यानेचा होत असतो. भारतीयांच्या जीवनात दूधाला अनन्यसाधारण महत्व असल्यामुळे असेल कदाचीत पण दूधाला आपल्याकडे 'पुर्णान्न' समजलं जातं. पुराणकाळापासून दुध आणि दुग्धजन्य पदार्थांबाबत भारतीय लोक सश्रद्ध असून सुद्धा दूध उत्पादन प्रक्रियेकडे बघण्याचा आपला दृष्टीकोन अनेक वर्ष अशास्त्रीय होता. गलीच्छ गोठ, गाई-म्हैशींच्या आरोग्याकडे दुर्लक्ष आणि दूधातील भेसळ या सर्वांच्या एकत्रित परिणामामुळे, दुधाचा वापर अनेक रोगांचं मुळ कारण ठरत होताच त्याशिवाय दूध उत्पादन हा एक प्रभावी आर्थिक व्यवसाय ठरू शकतो याकडेही आपले

अनेक वर्ष दुर्लक्ष झाले होते. अशा परिस्थितीत बहुराष्ट्रीय कंपन्यानी दूधावर आधारीत उत्पादनांच्या भारतीय बाजारपेठेत आपला जम बसवला नसता तरच नवल म्हणावं लागेल! सुदैवानं अशी परिस्थिती फार काळ टिकणार नाही.

दूध उत्पादनांच्या बाबतीत भारत केवळ स्वयंपूर्णच नाही तर जागतिक बाजारपेठेतील एक प्रमुख उत्पादक देश म्हणून सुद्धा नावारूपास आला. आज जागतिक स्तरावर जिथे कुठे दूधाचा उल्लेख होतो, त्या प्रत्येक ठिकाणी भारताचं नाव आदरपूर्वक घेतलं जातं. हा चमत्कार घडण्यामागे ज्या हजारो छोट्या दूध उत्पादक शेतकऱ्यांचे श्रम, जिद्द आणि चिकाटी कारणीभूत आहेत त्या सर्वांचं एकत्रित प्रतिक म्हणून डॉ. वर्गीस कुरीयन याच्यांकडे बघितलं जातं. दूध आणि डॉ. वर्गीस कुरीयन यांच नातं एवढ घट्ट झालं आहे की 'दूधवाला' कुरीयन अशी कोणी डॉ. वर्गीस कुरीयन यांची ओळख करून दिली तर त्याचा डॉ. कुरीयन यांना आनंदच होतो. सुमारे साठ वर्षापुर्वी गुजराथ राज्यातील कैरा जिल्ह्यामधल्या आणंद गावी तरूण वर्गीस यांच जाणं झालं आणि त्या क्षणापासून त्या गावाचं भविष्यच बदलुन गेलं. अर्थात आणंद गाव भविष्यात दैदीप्यमान इतिहास घडवणार आहे याची त्यावेळी कोणालाच सुतराम कल्पना नव्हती. पुढील साठ वर्षात दूधाच्या निमित्ताने गुजराथ राज्याचा कायापालट कसा झाला हे बघणे जसे मनोरंजक आहे तसेच त्या सर्व घडामोडी प्रेरणादायी सुद्धा आहेत. आज ऐंशी वर्ष पुर्ण करणारे डॉ. वर्गीस कुरीयन हे त्या घडामोडींचे निव्वळ साक्षीदारच नव्हे तर त्या घटनांचे प्रमुख शिल्पकार सुद्धा आहेत.

हरीतक्रांतीने ज्या प्रमाणे कोट्यावधी भारतीयांच्या जीवनस्तरामध्ये बदल घडवला, त्याच प्रमाणे त्या नंतरच्या धवल क्रांतीने म्हणजेच दूधाच्या महापुरामुळे भारतीयांची जीवनशैली पार बदलुन टाकली. अन्न, पाणी, तेल यासारख्या जीवनावश्यक गोष्टींनी सतत टंचाईग्रस्त भारतात दूधाचा महापुर निर्माणकरण्याचा चमत्कार ज्या धवल क्रांतीमुळे झाला त्या क्रांतीचा प्रमुख करता-करविता म्हणून डॉ. वर्गीस कुरीयन यांच्याकडे सार्थपणे बघितलं जातं.

सहकारी तत्व अधिक आधुनिक व्यवस्थापन कौशल्य - उणे पक्षिय राजकारण अशा समीकरणावर उभ्या राहीलेल्या कैरा जिल्हा सहकारी दूध उत्पादक युनीयनला डॉ. वर्गीस कुरीयन यांची साठ दशकांची सक्षम साथ मिळाली. या भागीदारीमधुन निर्माण झालेल्या विविध संरक्षणाचं जाळं आज देशभरात विणलं गेलं आहे. अत्याधुनिक डेअरी स्थापनेबरोबरच डेअरीच्या विकासासाठी आवश्यक पुरक संरक्षणाची उभारणी डॉ. कुरीयन यांनी फार कुशलपणे केली. त्यातुनच राष्ट्रीय डेअरी विकास मंडळ, 'इरमा' नावाची व्यवस्थापन शिक्षणाची संस्था, हैद्राबाद येथील रोगप्रतिबंधक लस निर्माण करणारी प्रयोगशाळा या सारख्या जागतिक दर्जाच्या योजना कार्यान्वित झाल्या.

देश विदेशातील सर्व प्रतिष्ठेचे सन्मान प्राप्त असलेल्या डॉ. वर्गीस कुरीयन यानां यशवंतराव चव्हाणांच्या नावे दिल्या जाणाऱ्या पुरस्काराचे विशेष अप्रुप असल्याचे त्यांनी प्रस्तुत प्रतिनिधीला मुलाखती दरम्यान सांगितलं. सर्वांना बरोबरीने घेऊन जाणाऱ्या यशवंतराव चव्हाणांच्या स्वभाव वैशीष्ट्यामुळेच महाराष्ट्रात सहकाराची पाळंमुळं खोलवर रूजू शकली असल्याचे डॉ. कुरीयन यांनी आवर्जुन नमूद केलं.

सन २००१ च्या यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कारासाठी धवलक्रांतीचे जनक डॉ. वर्गीस कुरीयन यांची निवड केल्याबद्दल निवड समिती अभिनंदनास पात्र आहे. कारण डॉ. वर्गीस कुरीयन हे अशा निवडक व्यक्तींपैकी एक आहेत की ज्यांचं भारतीयांवर आभाळा एवढे उपकार आहेत.

- सुनिल बालावलकर